**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 11 | July 2015**
**ISSN:- 2393-8900**

**Research Article**

# *महाराज सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक कार्य व सद्यस्थिती*

*घाटुळे स्वाती शिवाजी*

माणदेश महाविद्यालय, जुनोनी , ता. सांगोला, जि. सोलापूर.

*सारांश* –

''माणूस हा जन्मतः शहाणा नसतो तर त्याला शिक्षण दिल्याने तो शहाणा बनतो'' या विचाराचे पाईक असणारे श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या 1875 ते 1929 या कालावधीत बडोदा संस्थानचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचविले. भारतातील अनेक संस्थानापैकी बडोद्याचे संस्थान हे प्रगतशील व प्रथम श्रेणीचे संस्थान होते. त्यांच्या विचारावर ब्रिटिश शासनव्यवस्थेचा, त्यांच्या धोरणांचा प्रभाव असुनसुद्धा भारतीय समाजातील समस्या सोडविण्यासाठी, सुधारणा करण्यासाठी प्रभावी अशा उपाययोजना, कार्यक्रम तयार करण्याचे आणि प्रत्यक्षात व्यवहारात आणण्याचे त्यांचे धोरण होते. त्यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान महत्वपूर्ण ठरते. महाराज सयाजीराजे यांनी सुधारणावादी व उदारमतवादी धोरणाने बडोदा संस्थानात शिक्षणाच्या गंगोत्रीचा प्रवाह वाहता केला. प्रस्तूत शोधनिबंधात महाराज सयाजीराजे गायकवाड यांच्या शिक्षणविषयक धोरणांची भूमिका व भारतीय शिक्षणाची सद्यस्थिती यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

### *प्रस्तावना :*

''विद्या जन्माबरोबर डोक्यात असावी लागते तरच पुढे शहाणपणा येतो'' या पारंपारिक विचाराशी ते सहमत नव्हते. महाराजांनी स्वतः शिक्षणाचा अनुभव घेतला होता. शिक्षणाशिवाय समाज शहाणा होणार नाही हे त्यांनी स्वताच्या अनुभवाने ओळखले होते. अज्ञानी, अब्रम्हण्य प्रजा शिक्षणाने शहाणी होवू शकते. दारिद्रय व रोगराई या सर्वांचे मूळ अज्ञान आहे आणि शिक्षणप्रसार हाच त्याच्यावर उपाय आहे. म्हणून गाव तेथे शाळा झालीच पाहिजे असा महाराजांचा निश्चय होता. त्यासाठी त्यांनी प्रत्येक खेडयात शाळा स्थापन करून लोकांच्या उंबरठयापर्यंत शिक्षण पोहचविण्याचा प्रयत्न केला.

### *प्राथमिक शिक्षण सक्तीचे*

महाराज सयाजीराजे गायकवाड यांनी सर्वात मोठी शिक्षणविषयक सुधारणा केली ती म्हणजे प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. याचा पहिला प्रयोग इ. स. 1892 मध्ये अमरेली येथे केला. अमरेली तालुक्यातील 9 गावात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याबद्दलचा कायदा लागू केला. त्याकरिता महाराजांनी 31,790 रू मंजूर केले. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची व्याप्ती वाढवून इ. स 1906 मध्ये ती संपूर्ण संस्थानात अंमलात आणली. त्यासाठी मुलीचे वय 8 ते 12 व मुलाचे वय 8 ते 14 वर्ष केले. या वयोमर्यादेच्या आतील मुलामुलींसाठी शिक्षण घेणे 1906 सालापासून सर्व राज्यभर सक्तीचे केले.

इ. स. 1907 मध्ये त्यांनी प्राथमिक शिक्षण घेण्याच्या वयाच्या अटीमध्ये बदल केला तो असा, मुलांचे वय 6 वर्ष पूर्ण झाल्यानंतर त्याला 12 वर्षे पूर्ण होईपर्यंत चौथीचे शिक्षण द्यावे या पूर्वीच्या विचारात बदल करून त्यांनी 12 वर्षाऐवजी

15 वर्षे पूर्ण होईपर्यंत पाचवीचे शिक्षण घ्यावे असा नियम केला. सर्वसामान्य जातीतील किंवा धर्मातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी सहावी पर्यंतचे सर्व शिक्षण मोफत द्यावे असे ठरविले. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान ठरले.

### *अस्पृश्य व आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय*

महाराजांनी सक्तीचे व मोफत शिक्षण केले पण त्याबरोबरच अस्पृश्य व आदिवासींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले. बडोदा संस्थानातील अस्पश्य व आदिवासींच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शाळा सुरू केल्या. ज्या विद्यार्थ्यांची शिक्षण घेण्याची परिस्थिती नाही त्या विद्यार्थ्यांना महाराजांनी वस्तीगृहाची व शिष्यवृत्तीची सोय केली. याचाच लाभ महर्षी कर्वे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मिळाला. ज्या विद्यार्थ्यांना पुस्तके विकत घेता येत नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी वाचनालये व फिरती वाचनालये सुरू केली.

आदिवासींच्या शिक्षणासाठी 'कालिपरज' व 'वाघेर' या अत्यंत मागासलेल्या जंगली, डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या जातीनांही शिक्षण देण्याची योजना अंमलात आणली मोफत वसतीगृहाची सोय केली. बडोदा संस्थानातील सोनगढ, प्यारा, महुवा, अनावल, वानकल व तिलकवाडा अशा सहा ठिकाणी वसतीगृह व शाळा स्थापन केल्या.

शिक्षण हे ठरावीक वर्गापूरते मर्यादित न राहता समाजातील सर्व जाती–धर्माच्या लोकांना मिळाले पाहिजे. या उद्देशाने शिक्षणप्रमुखाला त्यासंदर्भात सूचना केल्या. मुस्लीम धर्मात पडदा पध्दत असल्यामूळे त्यांच्या धर्माप्रमाणे शिक्षण देण्यासाठी स्वतंत्र शाळेची स्थापना केली मुस्लिमांच्या शिक्षणासाठी निरनिराळया ठिकाणी 83 सरकारी 13 खाजगी उर्दू शाळा काढल्या. या शाळेत एकंदर 10,900 मुले शिक्षण घेवू लागले. ज्या लोकांना पडद्याची पध्दत असेल त्यांच्यावर आपल्या मुली शाळेत पाठविण्याची सक्ती करू नये तथापि शाळेतील अभ्यासक्रमाप्रमाणे आपल्या मुलांना घरी शिक्षण देण्याची जबाबदारी आहे असे त्यांना समजावून दिले. तर त्यांना शिक्षण कसे द्यावे या बद्दलचे नियम हे शिक्षणाधिकाऱ्यांनी ठरवावे असे सांगितले. आणि पुढील काळात त्यांनी मुस्लिमांसाठी स्वतंत्र शाळेची स्थापना केली. जातीपातीची बंधने न तोडता सर्वांनी शिक्षण घेवून शहाणे झाले पाहीजे हे महाराज सयाजीराजे यांचे ध्येय होते.

### *कलानूभवाचे शिक्षण*

बडोदा संस्थानातील विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे व्यावसायिक शिक्षण घेता यावे यासाठी महाराजांनी 1890 साली कलानुभवाची स्थापना केली. वेगवेगळया प्रकारच्या तंत्रशिक्षणाला चालना दिली. त्यामध्ये कृषिविषयक शिक्षण, इलेक्ट्रॉनिक, मेकॅनिकल, फिटर इ. तंत्रज्ञान विषयक शिक्षण दिले जात होते. आपल्या संस्कृतीची जोपासणा करणारे संगीत, नृत्य, नाट्य, वादन इ. प्रकारच्या शाळा स्थापन केल्या. महाराजांचे दिवाण टि. माधवराव यांनी म्हैसूरहून चित्रकार रविवर्मा यांची ''शकुंतला व सीतापथ'' नावाची दोन चित्रे महाराजांना भेट म्हणून पाठविली होती. ती त्यांना इतकी आवडली की, त्या चित्राच्या चित्रकाराला रविवर्माला महाराजांनी बडोद्याला बोलावून घेतले. बडोद्याच्या दोन वर्षाच्या काळात त्यांनी अनेक उत्तम कलाकृती तयार केल्या. पुढे महाराजांनी मि. गेलर्ट या जर्मन तंज्ञाच्या मदतीने मुंबईत क्रोमोलियो पध्दतीने चित्रे छापणारा अद्यावत छापखाना सुरू केला. तो छापखाना रविवर्मा प्रेस या नावाने प्रसिध्द झाला. या संग्रहाचा लाभ घेणारा विद्यार्थी वर्ग राज्यात असणे शक्य नव्हते म्हणून महाराजांनी चित्रकला फोटोग्राफी इ. कलांचे शिक्षण देणारे स्वतंत्र वर्ग सुरू केले. 1890 मध्ये धंदे शिक्षण, शाळा, टेक्निकल स्कूल चालू केले. 1902 ते 1908 पर्यंत घडयाळे बनविण्याचा एक वर्ग चालविला. ललीत कलांच्या विकासाची सोय व्हावी यासाठी चांगल्या योग्यतेचे अध्यापक नेमले. न्यायमंदिर, प्राच्याविद्या, संशोधन संस्था, विद्यापीठ भवन अशा जगविख्यात वास्तू निर्माण केल्या.

### *परदेशी शिक्षणाची सोय*

परदेशातील तंत्रज्ञानाचा फायदा आपल्या देशाला होण्यासाठी आपल्या देशातील विद्यार्थी परदेशात शिक्षणाला पाठविण्यासाठी महाराजांनी आघाडी घेतली. विविध क्षेत्रातील ज्ञान मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना परदेशात जाण्याची संधी दिली. विद्युतशास्त्र, मुद्रणकला, शिक्षण, कायदा, समाजशास्त्र अर्थशास्त्र, तंत्वज्ञान, वेदांत, शिल्प, घड्याळशास्त्र, इ. शास्त्राच्या अध्ययनासाठी त्या–त्या विषायात प्राविण्य मिळविण्यासाठी अनेक विद्यार्थी परदेशात पाठविले. प्रत्येक वर्षी पाच विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी परेदशात पाठविण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला. अनेक औद्योगिक संस्था उभारल्या. बनारस विद्यापीठाला दोन लाखाची देणगी आर्थिक मदत म्हणून दिली.

महाराजांनी शिक्षण सक्तीचे व मोफत केले. मुले शाळेत येवू लागली पण अध्यापन करणाऱ्या शिक्षकास अध्यापनात तरबेज करण्यासाठी, नविन शैक्षणिक विचारांची महिती होण्यासाठी इ. स. 1872 मध्ये शिक्षक–प्रशिक्षण संस्था स्थापन केली. शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी मुलींच्या शाळेत स्त्री शिक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी 1882 साली स्त्री शिक्षणपध्दतीची पाठशाला ज्तंपदपदह बवससमहम वित् वउमद स्थापन केली.

महाराज सयाजीराव गायकवाड यांनी 63 वर्षाच्या कारकिर्दीत चोवीस युरोपसफरी केल्या. स्वताच्या या प्रवासास ''उदयमशील विश्रांती'' असे नाव देत. जगातील कोणतीही चांगली गोष्ट ते बडोद्यात साकार करण्याचा प्रयत्न

करीत. सरकार आज अनेक योजना आपल्या देशात राबवित आहे त्याच योजना महाराजांच्या राज्यात इतक्या यशस्वीरित्या राबविल्या की त्यांच्या यशाचे गमक नव्या संदर्भात समाजातील प्रत्येक घटकाने समजून घेणे उपयुक्त ठरते. महाराजांनी आपल्याकारकिर्दीत प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. रोजगार प्राप्त होण्यासाठी धंदेशिक्षण दिले. सद्यस्थितीत जिल्हा परिषद व महानगरपालिकेच्या शाळेकडून शिक्षण सक्तीचे व मोफत मिळते, पण खाजगी संस्थांकडून शैक्षणिक फी घेतली जाते. त्यामुळे गरिब व सर्वसामान्य विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण घेणे अवघड जाते. त्यासाठी महाराजांचे विचार व कार्य सद्यस्थितीत अत्यंत महत्वाचे ठरतात.

आज शिक्षकामध्ये अध्यापन कौशल्य निर्माण व्हावे यासाठी क्ष्मकए ठण्मकए डण्मक हे शिक्षणशास्त्र कॉलेज कार्यरत आहेत. परंतू महाराजांनी आपल्या संस्थानात 19 साव्या शतकात या शिक्षणप्रणालीचा अवलंब केला होता शिक्षकांना शिक्षण देणाऱ्या संस्था व मुलींसाठी स्त्रीशिक्षिका तयार करण्यासाठी स्त्रीशिक्षण संस्था स्थापन केल्या. देशाचे सांस्कृतिक वैभव वाढवायचे असल्यास गायन, चित्रकला, शिल्पकला, वाडमय, यांची वृद्धी होणे आवश्यक आहे. महाराजांनी हे जाणून या कलांच्या वृध्दीसाठी प्रयत्न केले होते.

शासन आज शालाबाहय विद्यार्थ्यांची गणना करून त्यांना शिक्षणप्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. परंतू महाराजांचे त्यावेळचे कार्य आज प्रेरणादायी ठरते. त्यांनी आपल्या संस्थानात अज्ञान, अब्राम्हणी, आदिवासी व हरिजन या सर्वांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळेची, वसतीगृहाची स्थापना केली. वाचनालये, फिरती वाचनालये यांची मोफत सोय केली. त्यांचे हे कार्य आज प्रेरणादायी ठरते.

## *संदर्भ :*

1)निंबाजीराव पवार, जेव्हा गुराखी राजा होतो, सयाजी प्रकाशन, नाशिक, 2008.
2)डॉ. विश्वनाथ पांडूरंग दांडेरक, सयाजीराव गायकवाड, ठोकळ प्रकाशन, पुणे, 1985.
3)भालचंद्र चिंतामणी लेले, सयाजीगौरव ग्रंथ, वैभव प्रेस, गिरगाव मुंबई 1933.
4)प्राचार्य रा. ज्ञा. गायकवाड, महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1978
5)दाजी नागेश आपटे, श्री महाराज सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र, चित्रा बजार, कर्नाटक 1936.



***घाटुळे स्वाती शिवाजी***
माणदेश महाविद्यालय, जुनोनी , ता. सांगोला, जि. सोलापूर.